महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा संवर्ग (गट-क) कर्मचाऱ्यांच्या विशेष बाब म्हणून करावयाच्या बदल्या

## नगरपरिषद प्रशासन संचालनालय

७ वा मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी, बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

क्र.नपप्रसं-२०२५/कक्ष-३/संवर्ग-कर्म/बदली/ 4239

दिनांक - 3 0 MAY 2025

वाचा:

१. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम२००५ ,
२. महाराष्ट्र नगरपरिषद/ नगरपंचायती, औद्योगिक नगरे राज्यसेवा (समावेशन, सेवाप्रवेश व सेवाशर्ती) नियम, २००६ (सुधारणासह)
३. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एमसीओ२०१७/प्र क्र ११९/नवि-१४ दि ११-०५-२०१७
४. संचालनालयाचे पत्र क्र नपप्रसं २०२५/संवर्ग कर्म/बदली/प्रस्ताव/३०८ दि ०९ जाने २०२५, क्र ३११० दि ०४ एप्रिल २०२५, क्र ३३४१ दि २१ एप्रिल २०२५
५. अवर सचिव नवि १४ नगर विकास विभाग यांचे पत्र क्र एमसीओ २०२५/प्र क्र १७७/नवि १४ दि १९-०५-२०२५

# आदेश

उपरोक्त वाचा क्र ३ नगरविकास विभागाचे दि ११ मे २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या बदल्या करण्यास सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना घोषित करण्यात आलेले आहे.

वाचा क्र १ मधील तरतूदीनुसार विशेष बाब म्हणून करावयाच्या बदल्यांबाबत वाचा क्र ४ अन्वये लगतचे वरिष्ठ प्राधिकारी म्हणून मा प्रधान सचिव, नवि-२ यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने वाचा क्र ५ च्या पत्रान्वये सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५, मधील तरतुदी व वाचा क्र ३ अन्वये प्राप्त अधिकारानुसार खालील तक्त्यात नमूद संवर्ग कर्मचाऱ्यांच्या विशेष बाब म्हणून बदल्या करण्यात येत असून, त्यांची रकाना क्र ५ मध्ये दर्शविलेल्या नगरपरिषदा/नगरपंचायतीमध्ये बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | संवर्ग व श्रेणी | सद्या कार्यरत नगरपरिषद / नगरपंचायत | बदलीने पदस्थापना केलेली नगरपरिषद/नगरपंचायत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | दत्तात्रय अंकुश गायकवाड | स्वच्छता निरीक्षक श्रेणी क | माढा जि सोलापूर | आळंदी जि पुणे |
| २ | महादेव मारोती बळवंते | पाणीपुरवठा अभियंता श्रेणी क | औंढा जि हिंगोली | मानवत जि परभणी |
| ३ | यामलवार सुनिल बालाजी | पाणीपुरवठा अभियंता श्रेणी क | पाथरी जि परभणी | पालम जि परभणी |
| ४ | विनोद मधुकर बोरकर | कर निर्धारक व प्रशासकीय अधिकारी श्रेणी ब | लोणावळा जि पुणे | बार्शी टाकळी जि अकोला |
| ५ | मनोज वसंतराव पाटील | कर निर्धारक व प्रशासकीय अधिकारी श्रेणी ब | नगरपरिषद प्रशासन संचालनालय | लोणावळा जि पुणे |

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | संवर्ग व श्रेणी | सद्या कार्यरत नगरपरिषद / नगरपंचायत | बदलीने पदस्थापना केलेली नगरपरिषद/नगरपंचायत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६ | ओंकार सुनिल शिंदे | कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी श्रेणी ब | कोरेगाव जि पुणे | सासवड जि पुणे |
| ७ | सुधीर हरिभाऊ नाईक | कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी श्रेणी ब | दौंड जि पुणे | नांदगाव खांदेश्वर जि अमरावती |
| ८ | संचित कृष्णा धुमाळ | कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी श्रेणी अ | नियुक्तीच्या प्रतिक्षेत | कोपरगाव जि अहिल्यानगर |
| ९ | रत्नरंजन दिनकर गायकवाड | स्थापत्य अभियंता श्रेणी अ | कराड जि सातारा | फलटण जि सातारा |
| १० | श्रद्धा देवानंद गोरडे | संगणक अभियंता श्रेणी क | आर्वी जि वर्धा | कर्जत जि रायगड |
| ११ | विद्या बाबुराव धवणे | कर निर्धारक व प्रशासकीय अधिकारी श्रेणी ब | जेजुरी जि पुणे | शेंदुर्जना घाट जि अमरावती |
| १२ | प्रसाद शरदकुमार पाटील | पाणीपुरवठा अभियंता श्रेणी क | मलकापूर जि सातारा | हुपरी जि कोल्हापूर |

१. उक्त अधिकारी/कर्मचारी यांना सध्याच्या कार्यरत पदावरुन दि.३०-०५-२०२५ रोजी (म.नं) पासून कार्यमुक्त करण्यात येत आहे. मुख्याधिकारी यांनी रिक्त राहणाऱ्या पदाचा अतिरिक्त कार्यभार संवर्गातील इतर कर्मचाऱ्यास देण्यात यावा.

२. संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी पदस्थापना दिलेल्या नगरपरिषदा/ नगरपंचायतींमध्ये दि.०२-०६-२०२५ रोजी रुजू होऊन तसा आपला अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करावा. तसेच मुख्याधिकारी यांनीही अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

३. संबंधित अधिकारी/कर्मचारी हे कार्यमुक्त झाल्यानंतर पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न झाल्यास व परस्पर रजेवर गेल्यास ती रजा अनधिकृत समजण्यात येवून संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

४. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे बदलीनंतरचे वेतन व भत्ते बदलीने पदस्थापना होणाऱ्या नगरपरिषदा/नगरपंचायतीमधून काढण्यात यावेत. तसेच संबंधित कर्मचाऱ्याचे अंतिम वेतन प्रमाणपत्र तात्काळ देण्यात यावे.

५. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची विशेष बाब म्हणून बदली केलेली असल्याने त्यांना बदलीप्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

६. बदली आदेशान्वये केलेली पदस्थापना रद्द करणे, त्यात बदल करणे यासाठी कोणत्याही प्रकारचे दडपण / दबाव आणू नये. तसे केल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम २३ नुसार शिस्तभंगाची कारवाई होऊ शकेल याची संबंधित कर्मचाऱ्याने नोंद घ्यावी.

(मनोज रानडे भा प्र से)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

**प्रत:** १. मा प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
२. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (संबंधित)
३. संबंधित कर्मचारी.